
## अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार : आणि दोन हात

मनोगत । वि. ना. श्रीखंडे

# रुग्ण-डॉक्टर संबंध बिघडणं ही चिंतेची बाब आहे!

डॉ. श्रीखंडे यांनी इंग्लंडमधील दोन्ही एफ.आर.सी.एस. परीक्षा पहिल्याच प्रयत्नात यशस्वीपणे पार केल्या. एक निष्णांत शल्यचिकित्सक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला. स्वादुपिंड आणि पित्ताशय या पोटामधील सर्वांत कठीण शस्त्रक्रियांमध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य प्राप्त केले. या देदीप्यमान यशोशिखराच्या मागील श्रीखंडे यांचा चढणीचा प्रवास मात्र अत्यंत कष्टाचा, मेहनतीचा आणि जिद्दीचा होता. त्यांच्या कुशल हातांनी अत्यंत कठीण आणि नाजूक शस्त्रक्रिया सहजपणे आणि यशस्वीपणे करण्यापर्यंत मजल मारली. ही त्यांची कष्टसाध्य यशाची कहाणी म्हणजे ...'आणि दोन हात' हे अनुभवकथन. इतर अनेक लोकप्रिय आत्मचरित्रांप्रमाणे केवळ चटकदार नाही. या अनुभवकथनाच्या लेखनामागे डॉ. श्रीखंडे यांची निश्चित अशी भूमिका आहे. आपल्या नेत्रदीपक यशाच्या मागील प्रेरणा त्यांना सर्वांपुढे ठेवावयाच्या आहेत.



मी अभ्यासात गोडी नसलेला एक सामान्य मुलगा. मला जिभेतील दोषाने आयुष्यभर त्रास दिला. आत्मविश्वासानं जगावं असं माझ्याकडे काहीही नव्हतं. भाग्य हे की घरातील सुसंस्कृत वातावरण व आपल्या हातामध्ये कौशल्य आहे याची लहानपणी झालेली जाणीव व घरामध्ये झालेलं त्याचं कौतुक, यामुळे तोच मी, जिद्दीने, अतोनात श्रम घेऊन (कोणतेही आर्थिक, सामाजिक, राजकीय पाठबळ नाही, मुंबईत ओळखी नाहीत अशा परिस्थितीत) देशात एक नावाजलेला सर्जन व उत्कृष्ट वक्ता म्हणून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकलो, हे उदाहरण अनेकांना स्फूर्ती देऊ शकेल असा मला विश्वास वाटला. म्हणून वयाच्या ७७व्या वर्षी 'आणि दोन हात' हे पुस्तक लिहायचा निर्णय घेतला. याला मिळालेले यश माझ्या स्वप्नापलीकडले ठरले.

माझं भाग्य की मला दीपस्तंभ बघण्याकरता घराबाहेर बघावं लागलं नाही. सदोदित कष्ट करून, पाहुण्यांनी, नातेवाईकांनी भरलेल्या घराचा गाडा कसा चालवायचा हे जाणणारी, सातवीपर्यंत शिकलेली माझी आई किती मोठी होती याची जाणीव वृद्धिंगत होत चालली आहे. माझे वडील उत्कृष्ट मानवाचे प्रतीक होते. साधेपणा, निष्कलंक चारित्र्य, प्रेमळ, आनंदी स्वभाव, हसतमुख चेहरा, लोकांना सतत मदत करण्याची वृत्ती. त्यांच्यामधल्या उदारमतवादी माणसाचं मला रोज दर्शन घडलं. 'सर्वसामान्य माणसाचा असामान्य सर्जन हो...' हा त्यांचा सल्ला वेदमंत्रासारखा मार्ग दाखवत राहिला. राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी मी दिल्लीला गेलो. सतत वडिलांची आठवण येत होती. ही भाग्याची घटना बघायला माझी आई मात्र हयात होती. मेडिकल कॉलेजमध्ये डिग्री मिळते. तिथे माणुसकी शिकवली जात नाही. जन्मजात मिळालेल्या देणगीमुळे माझ्या नशिबाने लाभलेले हातातील कौशल्य मला लोकांची दु:खे घालविण्याकरिता वापरता आले. त्यामुळे माझ्या जीवनाला अर्थ मिळाला. उत्तम कलावंत, नट, खेळाडू, सर्जन यांना अनेक वेळा यश पेलता येत नाही. ती शक्ती मला घरच्या संस्कारांतून लाभली. कदाचित माझ्या अडखळणाऱ्या जिभेचे लगाम माझे पाय जमिनीवरच ठेवत होते.

गेली ५५ वर्षे ऑपरेशन थिएटरमध्ये गेलो. माणसाच्या पोटात शिरून कार्यपद्धती, रोग समजले. जखमा आपोआप भरतात याचं सदैव आश्चर्य बघितलं. व्यवस्थित पौष्टिक आहार घेतला तर आतड्याला पडलेलं भोक कसं बंद होतं हा चमत्कार अनेक वर्षे बघितला. जठराला जोडलेलं लहान आतडं दोन-तीन दिवसांत कायमचं एकरूपी होतं. अदृश्य जंतू अथवा कॅन्सर विरोधी शरीराचा लढाईचा प्रसंग सदोदित सुरू असतो याची माहिती अजून थक्क करते. आपल्याला लाभलेलं शरीर ही किती मोठी देणगी आहे याची डॉक्टरना, विशेषत: सर्जनना सतत जाणीव होत राहाते. जीवनामध्ये घडणाऱ्या रोजच्या घटनांमागे एक मोठं रहस्य दडलेलं आहे, याची जाणीव आपल्या मनाला रोज प्रचंड ऊर्जा देत असते.

डॉक्टर कारणाशिवाय शस्त्रक्रिया करून पैसे उकळतात याची वर्णनं चवीनं केली जातात. लोकांना फसवून पैसे कसे कसे मिळवायचे याची साथ दिल्लीपासून गल्लीपर्यंत पसरलेली आहे. सर्जन यापासून अलिप्त नाहीत. प्रश्नांची चर्चा करण्यापेक्षा, उत्तर शोधायचा प्रयत्न केला जात नाही.

मी १९७२ साली एक माहितीवजा लिखाण करून रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना वाटलं. त्यात सांगितलेला सोपा मार्ग म्हणजे...

डॉक्टरला खालील प्रश्न विचारावेत :

१) शस्त्रक्रियेची गरज आहे का?

२) ती केली नाही तर काय होईल?

३) शस्त्रक्रियेनंतर अपेक्षित फायदा न मिळाल्यास काय करायचं?

४) रोग झालेला जो भाग काढला जातो, त्याची मायक्रोस्कोपखाली तपासणी झालीच पाहिजे.

५) मला सगळा रिपोर्ट तुमच्याकडून हवा आहे.

असं जर केलं, तर कोणतेही नैतिकतेचे धडे न देता, कित्येक अनावश्यक शस्त्रक्रिया टाळता येतात. कठीण परिस्थितीतून मार्ग कसा काढावा याचा एकदा ध्यास घेतला, की बाष्फळ टीका करण्यात ताकद खर्च न होता त्यातून सकारात्मक कार्य निर्माण होतं.

पोटातील तक्रारींकरिता येणाऱ्या ३० टक्के लोकांना कोणताही रोग नसतो. रोजच्या कटकटी, सुखी जीवनाच्या खोट्या अपेक्षा, कृतज्ञतेचा अभाव, असमाधानी स्वभाव, इतरांबद्दल सहानुभूतीचा अभाव, खाण्यावर ताबा नाही, व्यायामाचा कंटाळा यामुळे शरीरातील कोणताही अवयव नीट काम करत नाही. त्यासाठी तपासण्या, एन्डोस्कोपी, सी.टी. स्कॅन... आणि मग यामध्ये रोग सापडत नाही म्हणून वैद्यकीय व्यवसायावर टीका. नसलेला रोग कसा सापडणार? पेशंटच्या समाधानाकरिता डॉक्टर तपासण्या करतात. त्याचप्रमाणे महागड्या तपासण्या करून त्यांना व

मेडिकल इंडस्ट्रीला भरपूर फायदा मिळतो, कोणतीही जबाबदारी न घेता! रुग्णाला आत्मविश्वास देण्याऐवजी, 'धोका पत्करू नका, ताबडतोब तपासण्या करून घ्या' याचा प्रचार सध्या मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.

मी रोज कन्सल्टिंग रूममध्ये लोकांना ऐकवतो माझ्या सल्ल्याचं ध्रुवपद - मधुमेह नाही व रक्तदाब नाही याची वर्षातून एकदा तपासणी करून घ्या. जोपर्यंत वजन घटत नाही, ॲनिमिया होत नाही, थुंकीतून अथवा परसाकडच्या वाटेने रक्त जात नाही तोपर्यंत बाकी तपासण्यांच्या मागे लागू नका. मी व्याख्यानातदेखील सांगतो की रोज व्यायाम करा, सकारात्मक वृत्ती जागृत ठेवा, सायंकाळी भलत्या गोष्टी दूरदर्शनवर बघू नका, हसत चला.... मग कसल्याही काळजीचं कारण नाही. काही रुग्ण रागावतात की आम्ही काय उगाच तक्रारी करत आलो का? त्यांना योग्य सल्ला देणं हे माझं काम (त्यांना खूष ठेवणं नाही) हे व्रत मी आयुष्यभर पाळलं.

मी जेव्हा वॉर्डामध्ये जातो, त्या वेळेला ८० नजरा माझ्याकडे विश्वासानं बघतात. माझं हस्तकौशल्य इत्यादीबद्दलच्या कथा व दंतकथा त्यांना माहिती असतात. पण माझी उत्साहाने चाललेली वागणूक त्यांना मोठी मोलाची वाटते. डॉक्टरी व्यवसाय किती भाग्याचा! मी जेव्हा रुग्णासमोर शस्त्रक्रियेसाठी उभा असतो, तेव्हा माझा देह उभा नसतो - तर माझ्याबद्दलची माहिती, माझी ख्याती, प्रामाणिकपणा, माझी आश्वासक नजर, माझा स्पर्श त्याला शांत करतो. याकरिता डॉक्टरने माणुसकीचा उत्तम आदर्श आपल्या रोजच्या वर्तनातून दाखवला पाहिजे. रुग्ण आणि डॉक्टर यांचे संबंध बिघडणं ही चिंतेची गोष्ट आहे.

आजवरच्या वाटचालीत, प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या अनेक व्यक्तींच्या क्षुद्र मनांचं दर्शन घडलं, नैतिक दारिद्य उघडं पडलं; त्याचप्रमाणे सामान्य जीवन जगणाऱ्या, जिद्दीने, मनापासून काम करणाऱ्या अनेक व्यक्ती भेटल्या. मोठा मध्यमवर्गीय समाज असणाऱ्या, प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या आपल्या देशात, लोकांच्या जीवनाचं राहणीमान उंचावण्याच्या प्रयत्नांतून भारताची उन्नती होत आहे. परंतु ह्या प्रगतीत तितकाच किंवा त्यापेक्षाही मोठा वाटा भारतातील लक्षावधी अतिसामान्य लोकांच्या जिद्दीचा, कुरकुर न करता सकारात्मक काम करणाऱ्या श्रमजीवी जनतेचा कसा आहे हे मला रुग्ण म्हणून हॉस्पिटलमध्ये असताना समजलं.

नर्स पहाटे साडेपाचला घर सोडते, दोन तासांचा प्रवास करून साडेसातला हॉस्पिटलमध्ये पोचते. मन लावून हसतमुखाने काम करते, गर्दीतून परत जायला रात्रीचे अकरा वाजतात. सहा तासांत दुसरा दिवस सुरू होतो. वडील रिक्षा-ड्रायव्हर, बहीण कॉम्प्युटर शिकते, भावाला नुकतीच नोकरी लागली, आईने लग्न झाल्यावर ओपन युनिव्हर्सिटीतून शिक्षण घेतलं व आता बालवाडी चालवते... सर्वजण एका खोलीत राहतात. काबाडकष्ट करून, अस्तित्वाची लढाई झुंजणारे असंख्य शिलेदार भारतामध्ये आहेत, याचं निकटचं दर्शन माझ्या बॉम्बे हॉस्पिटलच्या एक महिन्याच्या वास्तव्यात मला घडलं. 'आदर्श' इमारतीमधील लोक भारताची प्रगती मंदावतील, परंतु बंद पाडू शकणार नाहीत हा विश्वास बळावला. मी आशावादी आहे.

१९५७ साली मी इंग्लंडला गेलो. आपल्यावर सत्ता गाजवणाऱ्या इंग्रजी लोकांकडे बघून माझे धाबे दणाणले. परंतु त्यांच्यातील मोठे गुण समजले. गांधीजींचा लढा इंग्रजी सत्तेशी होता, इंग्रजी माणसांविरुद्ध नव्हता. त्यांच्यातील शिस्त, प्रामाणिकपणा, गुणग्राहकता, न्यायी प्रवृत्ती यांचा अतिशय जवळून परिचय झाला. माझ्या तेथील वास्तव्यातील आठवणी मौल्यवान आहेत.

**माझ्या संकोची स्वभावामुळे, अडखळणाऱ्या जिभेमुळे माझ्या शिक्षणक्रमात कुणी मला गुरू लाभला नाही. मला जे आयुष्यात मिळालं नाही ते मी माझ्या विद्यार्थ्यांना भरभरून दिलं व स्फूर्ती देणारा शिक्षक म्हणून माझी ख्याती सर्वत्र पसरली. मेडिकलला असताना, 'श्रीखंडे, तुला चार वाक्यं बोलता येत नाहीत. तू डॉक्टर व्हायचा नाद सोडून दे. वडिलांचे पैसे फुकट घालवू नकोस...' हे सांगणारे शिक्षक, १९८० साली, मी स्वादुपिंडावर करत असलेल्या शस्त्रक्रिया बघण्याकरिता हजर राहिले व आपल्या जावयाला त्यांनी माझ्याकडे ट्रेनिंगकरिता पाठवलं. मी कोणत्याही विद्यार्थ्याला कधीही कमी लेखलं नाही. हजारो रोगी माझे खरे गुरू बनले आणि त्यांनी मला आयुष्याचा अर्थ समजावून दिला.**

मी भारतातील सहिष्णुतेचा, चांगल्या परंपरेचा पूजक आहे. एकमेकाला मदत करणाऱ्या समाजाचं मला आकर्षण आहे. देवावर विश्वास नसणाऱ्या नेहरूंवर भारतीय जनतेनं प्रेम केलं. 'पीड परायी जाणे रे' म्हणणाऱ्या गांधीजींवर प्रेमाचा वर्षाव केला. शिवाजी महाराजांबद्दल मला नितांत आदर आहे. या जाणत्या राजाचा लढा मोगल सत्तेविरुद्ध होता, मुसलमानांविरुद्ध नव्हता. त्यांच्या सैन्यात अनेक मुसलमान होते. ही सर्वसमावेशक भारतीय परंपरा आहे. विवेकानंद भारतातील चांगल्या संस्कृतीचे पाईक होते. ह्या देशात 'लोकशाही' ही किती महत्त्वाची देणगी आहे हे समजण्याकरिता 'हुकूमशाही' देशात काय चालतं याची कल्पना असली पाहिजे.

ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम ही आपली भक्तिस्थानं आहेत. जो दुसऱ्यासाठी झिजला, त्याला स्वत:मध्ये देव दिसला. या बहिणाबाईच्या देवावर माझा विश्वास आहे, अनुभवाच्या आधारे.

दु:खांनी काजळलेली हॉस्पिटलं ही माझी कर्मभूमी. बंदिस्त ओ.टी.मध्ये संपूर्ण विश्वासाने आपली शरीरं ज्या हजारो रुग्णांनी माझ्यावर विश्वास ठेवून ताब्यात दिली त्यांचा मी ऋणी आहे. वेदनांनी ग्रासलेली, खंगलेली शरीरं घेऊन, मृत्यूलादेखील हसतमुखाने सामोरे जाणारे कोकणातले केरोबा व जर्मनीतील याब्लॉस्की हे माझे आदर्श आहेत.

माझ्या संकोची स्वभावामुळे, अडखळणाऱ्या जिभेमुळे माझ्या शिक्षणक्रमात कुणी मला गुरू लाभला नाही. मला जे आयुष्यात मिळालं नाही ते मी माझ्या विद्यार्थ्यांना भरभरून दिलं व स्फूर्ती देणारा शिक्षक म्हणून माझी ख्याती सर्वत्र पसरली. मेडिकलला असताना, 'श्रीखंडे, तुला चार वाक्यं बोलता येत नाहीत. तू डॉक्टर व्हायचा नाद सोडून दे. वडिलांचे पैसे फुकट घालवू नकोस...' हे सांगणारे शिक्षक, १९८० साली, मी स्वादुपिंडावर करत असलेल्या शस्त्रक्रिया बघण्याकरिता हजर राहिले व आपल्या जावयाला त्यांनी माझ्याकडे ट्रेनिंगकरिता पाठवलं. मी कोणत्याही विद्यार्थ्याला कधीही कमी लेखलं नाही. हजारो रोगी माझे खरे गुरू बनले आणि त्यांनी मला आयुष्याचा अर्थ समजावून दिला.

विविधतेने नटलेल्या माझ्या समृद्ध जीवनाचा अनुभव लोकांच्यामध्ये वाटावा, त्यांच्या मनातील मरगळ कमी करावी, सकारात्मक वृत्ती जोपासावी या हेतूने (आत्मस्तुती अथवा अतिशयोक्तीचा दर्प असता कामा नये याची खबरदारी घेऊन) ७७व्या वर्षी पुस्तक लिहायला घेतलं. मला किती यश मिळालं हे सांगण्याचा हेतू मनाला शिवला नाही, पण मी काय शिकलो, कसं शिकलो, जीवनाचा अर्थ कसा समजला याची माहिती समजून काहीजणांच्या विचारात-आचारात फरक पडेल हा माझा विश्वास होता. तो किती मोठ्या प्रमाणात खरा ठरला याचा अनुभव गेले दीड वर्ष येत आहे. शेकडो पत्रं, फोन आले. पंचवीस ठिकाणी मुलाखती झाल्या. आयुष्याच्या सायंकाळी जेव्हा केस गळतात, स्मरणशक्ती मंदावते, सांधे धरतात, बरोबरीची माणसं अनंताच्या प्रवासाला निघून जातात, एकटेपणाची जाणीव नैराश्य गाठते, त्या काळामध्ये माझ्या ''...आणि दोन हात'' ह्या पुस्तकाने जादूची कांडी फिरवली. एकाच आयुष्यामध्ये पुनर्जन्माचा लाभ मिळाला.

सर्जनच्या शानदार प्रतिमेला सुसंगत असं, छाप पाडणारं भारदस्त व्यक्तिमत्त्व नाही, हुशार असल्याचा आरोप(!) कधी माझ्यावर केला गेला नाही, असं असूनही भारतातील व इंग्लंडमधील हजारो रुग्णांनी माझ्यावर त्यांचं जीवन सोपवलं याचा मला कधीकधी अचंबा वाटतो. रुग्णांना माझ्यामधील एका मजबूत गाभ्याचा स्पर्श होतो हेच मानावं लागेल. मी किती भाग्यवान!

प्रचंड नैतिक बळ आणि असामान्य कर्तृत्व असलेली माझी साधी आई व 'सामान्य माणसांचा असामान्य सर्जन हो' हे सांगणारे माझे संतप्रवृत्तीचे वडील, ही माझी दैवते! शाळेमध्ये पहिला नंबर कधीही न सोडणाऱ्या माझ्या मोठ्या भावाचं मला नेहमीच कौतुक वाटायचं व अजून वाटतं. त्याने कधीही मला कमी लेखलं नाही. सत्तर वर्षांपूर्वी, सायकॉलॉजीचा गंध नसलेल्या काळात आई-वडिलांनी आमच्यात तुलना केली नाही. घरातील समंजस वागणुकीमुळे घराबाहेर चालणाऱ्या टीकेचा माझ्यावर परिणाम झाला नाही.

**वि. ना. श्रीखंडे**
१५८, भालचंद्र रोड,
हिंदू कॉलनी, दादर,
मुंबई ४०००१४.
Mob. 9820761051

ओळख । अचला जोशी

# जिभेतील दोषाने त्यांच्या हातांना वाकबगार केले आहे!

डॉ. वि. ना. श्रीखंडे, एक नामांकित, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शल्यविशारद! अहोरात्र व्यावसायिक कामात बुडालेले. त्या कामाच्या व्यापात, कधी एखाद्या परिषदेचं अध्यक्षपद भूषवतात, कधी एखादा आंतरराष्ट्रीय पुरस्काराचा सन्मान स्वीकारायला प्रवासाला जातात, तर कधी भाषणमालेसाठी प्रबंध लिहीत असतात. त्यांच्या या व्यस्त जीवनक्रमात डॉक्टरांना (आम्हा मित्रमंडळींच्या किशोरला) सावकाशीनं भेटायचं तर आपण त्यांचं पेशंट म्हणूनच गेलं पाहिजे असं वाटतं. डॉक्टर कधी एका जागी बसलेले पाहिले की समजावं त्यांची कोणत्या तरी परिषदेत वाचायच्या प्रबंधाची तयारी चालू आहे.

अशा निरनिराळ्या कामांत व्यग्र असणाऱ्या डॉक्टर श्रीखंडेंनी आपलं आत्मवृत्त लिहिलं आणि त्यांच्या या पहिल्याच पुस्तकाला अनेक पारितोषिकं मिळून त्यांचा सन्मान झाला. आता तर महाराष्ट्र फाउंडेशनचं पारितोषिक मिळून त्यांच्या या पुस्तकाची कीर्ती सातासमुद्रापलीकडे पोचली आहे.

वास्तविक, त्यांच्या या क्षेत्रातल्या दीर्घ प्रवासात त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध करावेत, एका वेगळ्या जगाचं दर्शन वाचकांना घडवावं असा अनेकजण त्यांना आग्रह करत होते. ''शस्त्रक्रिया करताना सफाईदार काम करणारे माझे हात लिहायला लागले की एकदम जड होतात. परंतु माझ्या अनुभवातून समाजाला खूप सांगता येईल म्हणून लिहिलं पाहिजेच, हा विचार सतावत होता.'' या जाणिवेतून ते लिहायला लागले आणि अनेक अंगांनी संपन्न असलेली त्यांची यशोगाथा जणू एकटाकी लिहिली असावी अशी, ओघवती, साध्या, अनलंकृत भाषेत अवतरली.

'दोन हातांचं' डॉ. श्रीखंडे यांच्या व्यक्तिगत जीवनात किती वेगळ्या प्रकारचं महत्त्व आहे हे त्यांच्या जवळच्या सहवासातील मंडळींना चांगलं माहीत आहे. एखादा अवयव अधू असला तर दुसरा अवयव ते अधूपण भरून काढतो म्हणतात, तसं त्यांच्या बाबतीत झालं आहे. जडावलेल्या जिभेतील दोषाने त्यांच्या हातांना अधिक वाकबगार, तरल केले आहे.

लहानपणी त्यांनी साधा भोवरा फिरवला, तरी इतर मुलांपेक्षा त्यांच्या तळव्यावर तो अधिक काळ गरगरायचा. कॅरम खेळायला एकदा स्ट्रायकरने डाव फोडला की त्यांच्या रंगाच्या गोट्या क्वीनसह एकापाठोपाठ बोर्डावरून नाहीशा व्हायच्या. नदीच्या पाण्यावर चपटे दगड पाण्यालगत अशा समांतर पद्धतीने ते टाकायचे की उसळी घेत जाणाऱ्या त्या दगडानं उमटणाऱ्या भाकऱ्या कुठल्या कुठे दूरवर जात. त्यांनी रेखाटलेली चित्रं पाहून 'तू उत्तम चित्रकार होशील' असा त्यांच्या चित्रकलेच्या शिक्षकानं आशीर्वाद दिला होता.

या पुस्तकातला सर्वांत मनोज्ञ भाग आहे तो डॉक्टरांच्या संस्कारक्षम काळाचा. जिभेतल्या दोषामुळे वाणी अडखळे, बरोबरीच्या मुलांशी बोलायला संकोच वाटे, कधी शिकलेसवरलेले लोकही कुचेष्टा करत, सहज चेष्टेने त्यांच्या वैगुण्याबद्दल बोलून जात, ते लहान बालकाच्या जिव्हारी लागे. पण घरी, अत्यंत सुसंस्कृत आईवडिलांच्या निवाऱ्यात त्यांना या वैगुण्याची जाणीव करून दिली जात नसे. अत्यंत हुशार असलेल्या त्यांच्या मोठ्या भावाच्या बरोबरीने त्यांना वागणूक मिळे. आपल्या बाळाच्या कमतरतेची जाणीव असलेले आई-वडीलच नव्हे तर घरात बरोबर वाढत असलेला भाऊही त्यांच्यात आढळणाऱ्या गुणांचं कौतुक करीत असे.

डॉक्टरांनी कुठलेही लागेबांधे नसलेली मुंबई हे आपलं कार्यक्षेत्र निश्चित केलं आणि अथक प्रयत्नांनी, अंतःस्थ प्रेरणेनं आणि शल्यक्रियेतल्या नैपुण्यानं आपलं बस्तान तिथं बसवलं. आंतरदेशीयच नाही तर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ते डॉक्टर झाले. त्यांच्या या दीर्घ प्रवासात त्यांना आलेले अनुभव त्यांनी ''...आणि दोन हात'' या पुस्तकात

शब्दबद्ध केले. कुशल हात मिळून, व्यवसायातली अनैतिकता लांब ठेवून त्यांनी सच्चेपणाचा मार्ग सोडला नाही. कारण त्यांचं समाधान कामात होतं, त्यातून मिळणाऱ्या पैशात नव्हतं. एक यशस्वी सर्जन आणि चांगला माणूस म्हणून ज्यांच्या हयातीतच त्यांच्याबद्दल दंतकथा पसरायला लागतात अशा भाग्यवंतांपैकी डॉक्टर श्रीखंडे!

राष्ट्रपतींपासून सामान्यातला सामान्य रुग्ण असला तरी त्याची व्यथा सारखीच असते, हे जाणणारं त्यांचं सुसंस्कारित मन या पुस्तकात जागोजागी दिसतं. एका वॉर्डबॉयनं त्यांच्या जखम शिवण्यातल्या कौशल्याचं केलेलं कौतुक त्यांना स्वत:तला आत्मविश्वास वाढीस लागावा इतक्या मोलाचं वाटतं. कुणीही डॉक्टर शस्त्रक्रिया करत असताना थिएटरमध्ये वॉर्डबॉय, नर्स, थिएटर सिस्टर यांचा मेळ मदत करायला सज्ज असतो. अशा अनेक डॉक्टरांच्या शस्त्रक्रिया करतानाच्या पद्धती ही सर्व मंडळी पाहात असतात. डॉ. श्रीखंड्यांच्या उमेदवारीच्या, सुरुवातीच्या दिवसांतही त्यांचं नैपुण्य, रुग्णाच्या शरीराबद्दल त्यांना वाटणारा आदर, त्यामुळे कमीत कमी छेद घेण्याची, वाजवीपेक्षा जराही अधिक रक्तस्राव होऊ न देण्यासाठी धीमेपणानं, सांभाळून शस्त्र वापरण्याची सहृदय जाणीव ही सर्व मंडळी बघत असत. त्यामुळे, एका थिएटर सिस्टरनं मोठे मोठे डॉक्टर आजूबाजूला असूनही तिच्या वडिलांची शस्त्रक्रिया डॉ. श्रीखंडेंकडून करवून घेतली. ही घटना त्यांना शस्त्रक्रियेतलं पारितोषिक असावं इतकी लक्षणीय वाटते.

जिद्दीने झगडताना झालेल्या सकारात्मक वृत्तीमुळे त्यांना व्यवसायातल्या अनैतिक बाजूचं कधीही आकर्षण वाटलं नाही, की लवकर पैसा मिळवण्यासाठी कुठचेही गैर मार्ग घेण्याची गरज वाटली नाही. तसे मार्ग न घेता, शांत, स्थिर वृत्तीने आणि अंगच्या नैपुण्याने आलेल्या आत्मविश्वासाने यश यायला वेळ लागला तरी ते नक्की मिळणारच हा ठाम विश्वास खरा ठरला. त्यांचं स्वत:चं हॉस्पिटल झालं. अनेक ठिकाणांहून 'श्रीखंडे क्लिनिक'मध्ये कार्यानुभव घ्यायला विद्यार्थी यायला लागले. डॉ. श्रीखंडे नावाचा सर्वत्र गौरवानं उल्लेख व्हायला लागला.

स्वत: विद्यार्थ्यांच्या लीनतेने, डॉक्टर अधूनमधून परदेशी जाऊन, नव्या कौशल्यांमुळे तिथल्या शल्यशास्त्रात होणाऱ्या शास्त्रीय प्रगतीचा वेध घेऊन आपलं नैपुण्य कसदार, धारदार करत राहिले. उत्तमाचा वेध घेणारी मोकळी मनोवृत्ती विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांतून काही नवे मार्ग दिसतायत का याचा शोध घेत राहिली. 'डॉक्टर श्रीखंडे कल्चर' या विद्यार्थ्यांद्वारे गावोगाव गेलं.

रुग्ण आणि डॉक्टर यांचे बिघडलेले संबंध ही त्यांना चिंतेची बाब वाटते. डॉक्टरांनी माणुसकीचा उत्तम आदर्श रोजच्या वर्तनातून दाखवला पाहिजे, हे बाळकडू आपल्या स्वत:च्या वागण्यातून ते विद्यार्थ्यांना आणि पर्यायाने आपल्या सहवासात येणाऱ्या सर्वांनाच देत असतात.

आयुष्यात कुठेतरी कमतरता असली, अडचणी आल्या तरच त्यांच्याशी झगडताना आपले पाय जमिनीवरून सुटत नाहीत. आपल्या अडखळणाऱ्या जिभेनेच आपले पाय जमिनीवर ठेवले आहेत ही त्यांची धारणा त्यांच्यातल्या सुसंस्कृत, सकारात्मक दृष्टीची द्योतक आहे. जिभेत असणारा अधूपणा त्यांच्या हातात इतरांहून अधिक संवेदना देऊन शरीरानं भरून काढला आणि त्याचा डॉक्टरांनी उत्तम उपयोग केला हे तर खरंच, पण आपल्या मन:शक्तीने, निर्धाराने आणि अथक प्रयत्नांनी त्यांनी आपल्या जिभेच्या अधूपणावरही मात केली. मित्रमंडळीतही गप्पा मारताना चाचरणाऱ्या जिभेवर आपल्या इच्छाशक्तीने त्यांनी ताबा मिळवला. बोलण्यात प्रयत्नांनी सफाई आणली. विद्यार्थ्यांना शिकवताना, परिषदांतून भाषणं करताना त्यांच्या अनुभवांची सकस उदाहरणं ते देतात. हे अनुभव व्यक्त करताना केलेल्या अचूक शब्दप्रयोगांनी आणि मुख्य म्हणजे स्वरांचे

**पैशापेक्षा आयुष्यात दुसरे आनंद आहेत, निष्ठेने आणि न थकता प्रयत्न केले तर आज ना उद्या यश हे हमखास जवळ येईल, माणुसकी हाच मानसिकतेचा पाया असला तर आपल्या भोवतालचं सर्व जग आपलंसं करता येतं. उत्तमाचा वेध घ्यायला नेहमी देशी परदेशीच जावं लागतं असं नाही; मुख्य म्हणजे आपल्या व्यवसायाचा धंदा करू नये – हे संदेश 'आणि दोन हात' या पुस्तकात डॉक्टरांच्या अनुभवांद्वारे वारंवार आलेले आहेत, यातून शिकता आलं, घेण्यासारखं घेता आलं तर वाचकांचं उन्नयन व्हायला नक्कीच साहाय्य होईल. या पुस्तकाचं यश केवळ व्यावसायिक क्षेत्राशी निगडित नाही तर ते मनुष्यस्वभावातल्या उदात्ततेला, मंगलतेला साद घालणारं आहे.**

चढउतार सांभाळत आवाजावर आणि जिभेवर ठेवलेल्या हुकमतीने एक चांगला वक्ता म्हणूनही त्यांनी कीर्ती मिळवली. ही तपश्चर्या करणं आणि साध्य होणं सोपं नाही. पण असलेल्या व्यंगाचा आपल्या उन्नतीसाठी उपयोग करून घेण्याचा फार मोठा संदेश त्यांनी आपल्या उदाहरणातून दिला.

या पुस्तकात एका सर्जनचे अनुभव दिले आहेत. ते त्यांच्या रुग्णांशी, कार्यक्षेत्राशी निगडित असावेत हे सहजच आहे. मानवी मनोव्यापार बघता येणं, त्याचं चित्रण करणं आणि त्यावर भाष्य करण्याची ताकद असणं याला वेगळं सामर्थ्य लागतं. ते डॉक्टरांच्यात आहे. त्यांचा हा विषय उत्तम साहित्याचा विषय झाला आहे. डॉक्टरांच्या या पुस्तकात एका विश्वात्मक सत्याचं दर्शन होत आहे. डॉक्टरच्या आणि रोग्यांच्या मनात होणारी द्वंद्वं, आंदोलनं, यशाचा आनंद आणि अपयशाची निराशा ही एका घटनेशी किंवा एका माणसाशी निगडित न राहता त्याला सार्वत्रिकता आली आहे. त्यामुळे एकूण समाजालाच यातून खूप शिकण्यासारखं आहे.

आई-वडिलांनी आपल्या मुलाचं व्यंग त्याला कमीपणा येईल अशा तऱ्हेनं कधीही उघडं करू नये, उलट त्याच्या गुणांचं कौतुक करून त्याचा आत्मविश्वास वाढवावा, त्यातून एक जीव वाया जाण्यापासून वाचतो; पैशापेक्षा आयुष्यात दुसरे आनंद आहेत, निष्ठेने आणि न थकता प्रयत्न केले तर आज ना उद्या यश हे हमखास जवळ येईल, माणुसकी हाच मानसिकतेचा पाया असला तर आपल्या भोवतालचं सर्व जग आपलंसं करता येतं. उत्तमाचा वेध घ्यायला नेहमी देशी परदेशीच जावं लागतं असं नाही; मुख्य म्हणजे आपल्या व्यवसायाचा धंदा करू नये - हे संदेश 'आणि दोन हात' या पुस्तकात डॉक्टरांच्या अनुभवांद्वारे वारंवार आलेले आहेत, यातून शिकता आलं, घेण्यासारखं घेता आलं तर वाचकांचं उन्नयन व्हायला नक्कीच साहाय्य होईल. या पुस्तकाचं यश केवळ व्यावसायिक क्षेत्राशी निगडित नाही तर ते मनुष्यस्वभावातल्या उदात्ततेला, मंगलतेला साद घालणारं आहे. त्याला अशी अनेक पारितोषिकं मिळावीत ही सदिच्छा व्यक्त करताना अगदी अलीकडे आलेला एक अनुभव सांगावा वाटतो. व्यवसायातल्या ताण-तणावांनी आणि अविश्रांत मेहनतीनं डॉक्टरांच्या हृदयाने काही वर्षांपूर्वी तक्रार करायला सुरुवात केली. बायपास, अँजिओप्लास्टी यांसारखे उपाय झाले, त्यामुळे काही वर्षं चांगली गेली. आता त्यांच्या हृदयाची झडप बदलण्याचं ऑपरेशन करायची वेळ आली. कोणत्याही दृष्टीनं हे गंभीर होतं. जिवाला धोका होण्याची मोठी शक्यता होती. सर्व - अगदी सर्वजण त्यांना ते न करण्याचा सल्ला देत होते. पण शस्त्रक्रियेला पर्याय म्हणजे निवृत्तीचं संथ जीवन जगायचं आणि मस्तकावर केसानं टांगलेल्या तलवारीची अनिश्चित भीती, धाकधूक सहन करत उरलेलं आयुष्य कंठायचं. स्वत: डॉक्टर असल्यानं इतरांनाही न जाणवलेले धोके त्यांना कळले होते, पण अधू अवयवावर मात केलेल्या डॉक्टरांना अधू जीवन जगायचं नव्हतं. ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरवर पूर्ण विश्वास असला तर कितीही गंभीर शस्त्रक्रियेतून रुग्ण कसा बाहेर पडतो हे त्यांनी अनेकदा स्वत: पाहिलं होतं. आज डॉक्टर स्वत: रुग्ण होते. त्यांच्यावर त्यांच्या रुग्णांनी ठेवलेल्या विश्वासाप्रमाणे त्यांनी आपल्या डॉक्टरवर विश्वास टाकला, आपला जीव त्यांच्या स्वाधीन करण्याचं ठरवलं, त्यामुळे आदल्या दिवसापर्यंत आमच्यासारख्या मित्रमंडळींना आपण होऊन बोलावून घेऊन आमच्याशी ते नेहमीप्रमाणे गप्पा करत होते.

शस्त्रक्रियेची वेळ आली. डॉक्टरांच्या मनात नीरव शांतता होती. त्यांनी आई-वडिलांचं स्मरण केलं. जगातल्या उदात्त, धीरगंभीर वृत्ती त्यांनी आपल्या हृदयात सामावून घेतल्या. त्यानंतर निश्चयाने, मंगलत्वावरच्या विश्वासानं एखाद्या मंदिरात शिरावे तसे ते ऑपरेशन थिएटरमध्ये गेले. त्या जीवघेण्या दिव्यातून डॉक्टर सुखरूप पार झाले, त्याला आता तीन आठवडे झाले. येत्या संक्रांतीच्या दिवशी ते लोकांच्यात मिसळायला बाहेर पडणार आहेत.

डॉक्टरांची थोरली लेक नीना हिचा डॉक्टर आनंद नांदेशी विवाह झाला, त्याप्रसंगी मी मंगलाष्टकं केली होती. त्यांतल्या चार ओळी राहून राहून मनात घोळतायत :

''सुजन, जनक तवं किशोर, बाळे, शल्यशास्त्री गाजला;
श्रद्धा गुरुजनीं, निष्ठा ज्ञानी अहर्निश कष्टला
उदात्त या पेशाचा त्याने धंदा नच केला
असंख्य रुग्णांना तो साक्षात् परमेश्वर भासला।।''

आज, डॉक्टर श्रीखंडे आपल्याकडे श्रद्धेने येणाऱ्या असंख्य रुग्णांना रोगमुक्त करायला सुदृढ तब्येतीनं परतले आहेत. त्यांना निरामय दीर्घायुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा...

**- अचला जोशी**
आसावरी, सी-२१४, वीर सावरकर मार्ग,
मुंबई ४०००१६.
Mob. 9322790333